ISSN-2229-6476



# कंधारपूर

सौ. रमाताई कठारे
डॉ. विजया साखरे
डॉ. अनिल कठारे



ISSN - 2229-6476

# ९) श्रीक्षेत्र गोपाळपुर

डॉ. स्वराली कुलकर्णी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे

पंढरपूर हे महासमन्वययाचे क्षेत्र आहे. रूसलेल्या रूकमिणीला शोध ण्यासाठी व्दारकाधीश श्रीकृष्ण गोपाळपुर येथे येवून उभे राहिले. ते गोपाळपुर क्षेत्र पंढरपुर पासून एक किमी अंतरावर किंवा विष्णूपदापासून अर्धा किमी अंतरावर आहे. रूकमिणीचे पिता भिमकराजेही श्रीकृष्णा बरोबर येथे आले होते. याचेही मंदीर आपणांस गोपाळ कृश्ण मंदी रात पाहावयास मिळते. आतापर्यंत सर्व संतांनी पंढरपूचे/विठठलाचे महात्म्य वर्णन केले आहे. परंतु पंढरपूर इतकेच गोपाळपूरलाही महत्त्वाचे स्थान वारकरी संप्रदायात आहे. आशाढी व कार्तिकी पोर्णिमेला येथे सर्व पालख्या एकत्र येतात. गोपाळकाला होतो. सर्व वारकरी गोपाळकाल्याच्या वेळी लाहयाचा घास एकमेकांच्या मुखी घालतात. येथे गरीब, श्रीमंत /उच्च नीच भेद नाही लहानथोर वारकरी येथे एकमेकांच्या पाया पडतात गोपाळकाला झाल्यावरच वारीची सांगता होते असे या क्षेत्राचे महात्म्य आहे

## गोपाळपुर

विष्णुपदाच्या पश्चिमेस अर्धा किमी अंतरावर पुष्पावती नदीच्या काठी एका उंच टेकडीवर गोपाळकृष्णाचे मंदीर दृष्टीस पडते उत्तेरकडील प्रवेश व्दारातून पंधरा पाय–या चढून गेले की, संत नामदेवाचे वडील दामूशेटटी यांची समाधी आहे नंतर पाय–या चढत असतांना भाविकांना बसण्यासाठी दोन्ही बाजूस वरच्या बाजूने लागोपाठ 5 दगडी कटटे आहेत. या समाधीनंतर 22 पाय–या चढल्यानंतर मदिराचे भव्य प्रवेषव्दार आहे. प्रवेषव्दार सुस्थितीत, भव्य दगडी व लाकडी दरवाजा असलेले आहे. या प्रवेषव्दाराची लांबी 3.00 मीटर तर रूंदी 2 मीटर आहे. या

ISSN - 2229-6476

5 तर डावीकडे दोन कमळाच्या पाकळाप्रमाणे आतील बाजूने दगडी आव–यायुक्त कमानी आहेत. या आहेरील तटबंदीला पूर्ण अष्वमुखाची षिल्पपटटी आहे. प्रवेषव्दारातून आंत गेले की, दोन्ही बाजूस दीपमाळा आहेत. प्रवेषव्दारच्या आंत भव्य पटांगण असून त्याच्या चारही बाजंनी दगडी भक्कम सुस्थितीतील 36 ओव–या आहेत. या ओवरीच्या छताला आतून आष्वमुखाची षिल्पपटटी आहे. त्यावर दगडी बांध काम व त्यावर चारही बाजूरी किल्याला असते त्याप्रमाणे दगडी कंगोर आहेत. उत्तेरकडील प्रवेषव्दाराच्या आंत रूकमिणीचे आईवडील षुध्दमती व भिमकराजा यांचे मंदीर आहे. या मंदीराच्या सुरूवातीस पहिल्या भागात चार दगडी खांबावर आधारलेला भाविकांना बसण्यासाठी कटटा आहे. सभामंडप 12 दगडी खांबावर उभे असून त्याची लांबी 7.15 मी. तर रूंदी 4.25 मी. आहे समामंडपातील प्रत्येक चार दगडी खांबामध्ये एक खांब , छताचे दगडी चि–यावर चिर देवून केलेले आहे. गर्भगृह हे 7. 15 मी. लांब तर 10 मी. रूंद असून आतमध्ये मूर्ती आहेत. या मंदीराच्या उजव्या बाजूला दगडी चौथ–यावर उंबर आणि चाफा यांचे एकत्र झाड असून त्याखाली षिवपिंड व स्वयंभू मूर्ती आहे. ही दत्ताची मूर्ती काळया पाशाणाची 2 फूट उंचीची आहे.

पूर्वेकडील दरवाज्यासमोर श्रीकृशणाचे मंदीर आहे. मंदीराचे तीन भाग असून चार दगडी खांबावर आधारलेला भाविकांना बसण्यासाठी दगडी कटटा आहे. त्यानंतर सभामंडप 12 दगडी खाबांवर उभे असून त्याची लांबी 7.60 मी. तर रूंदी 5.60 मी. आहे. सभाग्रह संदर असून दगडी खाबांवर नागव्दय आहेत. तसेच खांबावर नक्षीदार चौरंग आहेत. यानंतर गर्भगष्हाचे प्रवेषव्दा सुबक असअसून प्रवेषव्दारावर दाक्षिणात्य षैलीचे नक्षीकाम आहे. प्रवेषव्दाराच्या उंब–यावरती ज्या पतीपत्नीने हे देउळ बाधले त्यांची प्रतिके आहेत. या प्रवेषव्दाराच्या दोन्ही बाजूस राक्षस मुखआहेत. गर्भग्रहात सुंदर देहूडा चरणी असलेली काळया पाशाणाची मूर्ती असून त्याच्या दोन्ही बाजूस गाय, हातात

ISSN - 2229-6476

बासरी आहे. गर्भग्रहाचे छत शटकोनी असून ते वरती निमूळते होत गेले आहे. पुढरपूरला येणारे सर्व वारकरी येथे एकत्र येवून आषाढी कार्तिकी पोर्णिमेस काला करतात. त्यापुढे एका आवरीत नारदपुनीचे व त्याच्यासमोर संत नामदेवाच्या मूर्ती आहेत. मंदीराच्या तिन्ही बाजूला मंदीराच्या वरती दगडी चौथारे बांधले असून त्याला स्वर्गाचे व्दार म्हणतात. पुढरपपूरला पिंडदान केल्यानंतर येथे येवून लाहया उधळल्यास मुक्ती मिळते अषी एक आख्यायिका आहे.

या मंदीरात लक्ष्मीनारायण मंदीर आहे. या मंदीरात जनाबाइच्या गष्हा, जनाबाइचा संसार, जनाबाइचे जाते आहे. या जात्यावर प्रत्यक्ष विठ्ठलाने जनाबाइबरोबर दळण दळले अषी दंतकथा आहे. हे कृश्ण मंदीर 1744 मध्ये तळेबावचे अनंत षामजी दाभाडे यांनी बांधले.

**विष्णुपद**

पुडलिक मंदीराच्या दक्षिणेस दिड किमी अंतरावर चंद्रभागा नदीच्या पात्रात पाशाण स्तंभावर दगडांनी बांधलेले हे विशणुपद मंदीर आहे. हे मंदीर 3.65 मी. उंच व 9.15 मी. लांब आहे. सोळ खांबी आकाराच्य मंदीराची मूळ रचना इ. स. 1640 मध्ये धामणकर बुवा यांनी केली. हे मंदीर चौरस आकृती असून त्याची बाजू 10.1 मी. आणि 3. 65 मी. उंचीच्या पाशाण स्तंभावर हे मंदीर उभारले आहे. प्रत्येक दगडी खांबांच्यामध्ये बातून व बाहेरून दगडी कमानी आहेत. मंदीरास षिखर नसले तरी छताच्या चारही बाजूंनी वरती दगडी अष्वमुखाचे षिल्पपटटी आहे. मंदीराच्यामध्ये श्रीकृष्णाची समावचरण आणि देहुडाचराण अषा दोन्ही प्रकारची पावले आहेत. त्याच्याच जवळ गाइची पावले व दहयाची कटोरी आहे. पुंडलिकासाठी श्रीकृशण येथे आले व आपल्या गाइना येथे चारापाणी देवून त्यांनी गोपांसह वनभोजन केले अषी कथा श्री प्रल्हाद महाराज बडवे यांच्या मुलाखतीतून आली. मार्गशिर्ष महिन्यात पांडुरंगाच्या प्रतिमा येथे आणली जातात. मार्गषिर्श महिन्यात येथे उत्सव सुरू असतो अनेक लोक वनभोजनासाठी या महिन्यात येथे येतात.

ISSN - 2229-6476

यानंतर मार्गषिर्श आमावस्येला या मुर्ती पुन्हा मंदीरात नेल्या जातात. या मंदीराच्या जवळ नदीच्या पात्रात नारदाचे एक लहान मंदीर आहे. हे मंदीर दगडी चौरस आकृती आहे. आंतमध्ये नारदाची संदर मूर्ती आहे. याच्या जवळ मुक्तकेषी तीर्थ आहे.

**संदर्भ साधने**

1. राणा पंढरीचा , डॉ . गोपाळ बेणारे, श्री संत वाडमय सेवा प्रकाषन पंढरपूर
2. पंढरी महात्म्य, डॉ. अरूण वाडेकर, शारदा साहित्य प्रकाषन, पुणे
3. सोलापूर जिल्ळयाची बखर, गोपाळ देशमुख, रेयु प्रकाषन, पुणणे
4. सोलापूर डिस्टिक्ट गझेटिअर 1977, गर्व्हमेंट आफ महाराश्ट, मंबई.
5. भारतीय संस्कृती कोश खंड 5, निलीमा तारके
6. सौ. बडवे कमल– पंढरीचा परिसर
7. पंढरपूरच्या अलक्षित कथा, मंजूळ वा. ल. , उत्कर्श प्रकाषन, पुणे

RNI MAHMAR 47540/13/1/2010
Posting under registration No. G-2/NND/PBP-387/2011.



प्रति,

PRINTED MATTER

---

---

---

प्रेषक :
सौ. रमाताई कठारे
महात्मा फुले हाऊसिंग सोसायटी, कंधार, जि. नांदेड, महाराष्ट्र -४३१७१४.